Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राचे संजीवक

— ६ —

४३८
५०

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ - सदन
गिरगाव, मुंबई

'सुधारक' कर्ते
आगरकर

— हा. ना. दिवेकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां भारत स्वतंत्र झाला आहे. आपला महाराष्ट्रही पुनरपि स्वातंत्र्य भोगीत आहे. सतराव्या शतकांत छत्रपति श्रीशिवाजीमहाराजांनीं महाराष्ट्राला जें स्वातंत्र्याचें सिंहासन मिळवून दिलें, तें इंग्रजी सत्तेनें ढासळून टाकलें. आपल्या मायभूमीला तिच्या हक्काचें तें सिंहासन परत मिळवून देण्यासाठीं जे कोणीं झटले व झगडले अशीं नररत्नें अनेक आहेत हें आपलें भाग्य होय.

स्वतंत्र वृत्ति व त्यागबुद्धि हे महाराष्ट्राचे विशेष गुण—त्याच्या सह्याद्रि-विंध्याद्रींइतकेच उत्तुंग व अभेद्य. ह्या गुणांची गरज स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं जितकी होती, तितकीच ह्यापुढेंही लागणार आहे. केवळ राजकीय पारतंत्र्य गेलें म्हणजे सर्वांगीण स्वातंत्र्य आलें असें थोडेंच आहे? आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, इत्यादि सर्व क्षेत्रांत आपल्याला स्वतंत्र व्हावयाचें आहे, नवा महाराष्ट्र, नवा भारत उभारावयाचा आहे. त्यासाठीं पुढील पिढ्यांपुढें नवीं ध्येयें, नवीं मूल्यें, नवीं श्रद्धास्थानें ठेविलीं पाहिजेत. अनास्था, आळस व भोगलोलुपता ह्यांच्या चिखलांत तरुण महाराष्ट्रीयानें रुतून बसतां कामा नये. ध्येयनिष्ठा, सेवावृत्ति व त्यागबुद्धि ह्या गुणांचें रक्त नवीन पिढीच्या नसांतून खेळेल, तरच आपला महाराष्ट्र, आपला भारत सर्वांगीण स्वतंत्रता उपभोगूं शकेल.

ह्या गुणांचें बीजारोपण कसें होणार? एक मार्ग म्हणजे त्या गुणांचे पुतळे असलेल्या पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें समजावून सांगणें. महाराष्ट्राला आंग्लशाहींतून मुक्त करण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं लोकोत्तर गुण प्रगट केले, अशांचीं बारा चरित्रें, त्या त्या गुणांवर भर देऊन, लिहिण्याचें मीं योजिलें आहे. राजकीय दृष्टीनें मृतवत् झालेल्या महाराष्ट्राला संजीवन देणाऱ्या विभूतींचीं हीं चरित्रें त्याला नैतिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादि क्षेत्रांतही नवजीवन देण्यास समर्थ ठरतील असा मला विश्वास वाटतो. महाराष्ट्राच्या कुशींतून असे थोर पुरुष "झाले आहेत, पुढें होणार" हा श्रीसमर्थांचा आशीर्वाद म्हणजे आपला संजीवनीमंत्रच आहे, नाहीं का?

दा. न. शिखरे

'महात्मा' कार्यालय, नातूबाग,
पुणें २, ता. १५ मे, १९५१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

28696
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



महाराष्ट्राचे
संजीवक
....५....



'सुधारक' कर्ते आगरकर

स्टाक प्रमाणीकरण १९८७-१९८८

लेखक
दा. न. शिखरे, एम. ए.

****

मूल्य आठ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रम

शिक्षणासाठीं पायपिटी	...	४
विद्येचें शिखर ...	...	९
देशभक्तांची जोडी ...	...	१५
प्राचार्याचें पद ...	...	२०
आद्य केसरीकार ...	...	२५
तुरुंगांतील तपश्चर्या	...	३०
जोडी फुटली ...	...	३६
मनाचें दर्शन ...	...	४३


ओ३म्
पुस्तक संख्या.....
पुस्तक पर सर्व प्रकार की लिखावटें लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

पहिली आवृत्ति : १९५३

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्राचें भाग्य थोर, म्हणूनच त्याला 'बाळ-गोपाळांची' जोडी लाभली. टिळक-आगरकर अगदीं जवळचे – जसे कांहीं जुळे भाऊच ! दोघांचाही जन्म एकाच वर्षी झालेला, दोघांनींही पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत राष्ट्रसेवेची शपथ घेतलेली, दोघांनींही न्यू इंग्लिश स्कूल स्थापण्यासाठीं रक्ताचें पाणी केलेलें, दोघांनींही फर्ग्युसन कॉलेजांत प्राध्यापक म्हणून काम केलेलें, 'केसरी'चें संपादकत्व दोघांनींही गाजविलेलें, त्यापायीं दोघांनींही तुरुंगवास भोगलेला, दोघेही वर्तनानें साधे, लेखणीनें तिखट, पण देशाच्या सेवेसाठीं दोघांचेंही आयुष्य चंदनासारखें झिजलेलें.

" आम्ही आमच्या राजकीय शृंखला तोडूं " असा आत्मविश्वास महाराष्ट्रीयांमध्यें लो. टिळकांनीं जसा निर्माण केला, तसा " आम्ही आमच्या सामाजिक बेड्या काढून टाकूं " असा निर्धार महाराष्ट्रीयांच्या मनांत प्रिं. आगरकरांनीं उत्पन्न केला. परक्या ब्रिटिश सरकारशीं लोकमान्य टिळक जितक्या तीव्रतेनें, चिकाटीनें व सामर्थ्यानें लढले, तशाच रीतीनें प्रिं. आगरकर सामाजिक अन्यायाशीं, दुष्ट चालीरीतींशीं आणि क्रूर रूढींशीं झगडले. राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक स्वातंत्र्य ह्यांच्या कृष्णा-कोयना महाराष्ट्रांत वाहविण्यास प्रारंभ टिळक-आगरकरांनींच केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणासाठीं पायपिटी

कृष्णा व कोयना ह्या नद्यांचा संगम कराड येथें आहे. तेथून तीन मैलांवर टेंभू ह्या नांवाचें खेडें आहे. तेथें १८५६ सालीं आगरकरांचा जन्म झाला. त्यांच्या मातोश्री सरस्वतीबाई ह्या कराडच्या. त्या देवादिकांचीं गाणीं रचीत असत. गोपाळरावांचे वडील गणेशराव – किंवा गणूअप्पा – कीर्तन-पुराण करीत असत. त्यांना सात मुलें झालीं. गोपाळराव सर्वांत धाकटे. संसार गरिबीचा, हातातोंडाची गांठ कशीबशी पडायची. मुलींचीं लग्नें व्हावयाचीं, त्यासाठीं खर्च करणें अवश्य. मग मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष – जवळ जवळ दुर्लक्षच.

पण गोपाळरावांची हिम्मत भारी, बुद्धि चलाख व महत्त्वाकांक्षा अस्मानाला भिडणारी. त्यांचें आजोळ कराडला होतें. तेथें गोपाळराव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिले. आपल्या दत्तूमामाबरोबर ते शिकले. बाराव्या वर्षी इंग्रजी तिसरी इयत्ता ते उत्तीर्ण झाले. त्यांचा अभ्यास चांगला असल्यामुळें शिक्षकांचें त्यांच्यावर मोठें प्रेम होतें. निबंधाच्या स्पर्धेंत त्यांनीं बक्षिसें मिळविलीं होतीं. कृष्णा-कोयनेच्या संगमांत पोहून, त्यांच्या वाळवंटांत हुतुतू खेळून, डोंगरावर चढून, त्यांनीं आपलें शरीरही चांगलें कमाविलें होतें. पण पुढें काय ?

प्रचंड प्रश्नचिन्ह !

त्यांच्या शिक्षणाला गरिबीनें खो दिला. नाइलाजानें व दुःखी मनानें त्यांनीं कराड येथें मुनसफ-कचेरींत कारकुनाची नोकरी पत्करली. पण त्या नोकरींत त्यांचें महत्त्वाकांक्षी मन कसें रमणार ? 'प्रकाश, अधिक प्रकाश' असें त्यांचें मन एकसारखें ओरडत होतें. पुढें शिकावें, वरच्या परीक्षा द्याव्या, मोठ्या पदव्या मिळवाव्या आणि आपण खूपखूप ज्ञान संपादन करावें, हा एकच ध्यास त्यांना लागलेला होता. कोर्टांत कारकुनी करतांना त्यांच्या डोळ्यांना आपल्याबरोबरीचीं मुलें पुढें गेलेलीं दिसत. संध्याकाळीं कृष्णेच्या कांठावर बसले असतांना त्यांच्या मनांत येई, 'माझ्या ज्ञानाचा प्रवाह असाच अथांग नि अखंड वाहाणार नाहीं का ?' मावळत्या सूर्याकडे पाहून त्यांना वाटे, 'माझें शिक्षणही असेंच मावळणार का ? आज मावळलेला सूर्य उद्यां उदयास येईल, परंतु माझें शिक्षण ? आतां संपलें तें कायमचेंच संपलें.' संध्याकाळ संपली आणि रात्र पडली. चोहोंकडे अंधार दाटला. आंत अंधार, बाहेर अंधार, अशा अवस्थेंत गोपाळराव घरीं जात. किती दिवस, किती रात्री, त्यांनीं अशा घालविल्या असतील !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'इच्छा तेथें मार्ग' हें कांहीं खोटें नाहीं. गोपाळरावांना कळलें कीं आपले चुलते वामनराव हे रत्नागिरी येथें शाळाखात्यांतील डेप्युटीच्या कामावर आहेत. 'त्यांनीं आपल्याला ठेवून घेतलें तर? तेथल्या हायस्कुलांत आपलें शिक्षण चालू होईल.' गोपाळरावांची आशा पालवली. त्यांनीं ठरविलें, आपण रत्नागिरीला जावयाचें. पण कसें? दीडशें मैलांचें अंतर तोडावयाचें कसें? त्या वेळीं कराड ते रत्नागिरी मोटारी नव्हत्या आणि आगगाडीचा तर अद्याप पत्ता नाहीं. मग घोड्यावरून? बैलगाडींतून? पण त्यासाठीं पैसे कोठले आणावयाचे? 'जय स्वावलंबन!' असें म्हणून गोपाळराव पायींच निघाले. वय अवघें तेरा वर्षांचें, पल्ला चांगला दीडशें मैलांचा. वाटेंत तो वाकडातिकडा आंबाघाट! रामशास्त्र्यांनीं काशीला विद्यार्जनासाठीं जाण्याइतकेंच हें मोठें धाडस! तें पाहून मामांना केवढें कौतुक वाटलें. आईबापांनाही अभिमान वाटला. फार काय? कराडचे मुनसफ रावसाहेब नागपूरकर ह्यांनीं त्यांची पाठ थोपटली आणि त्यांच्या हातांत पाऊणशें रुपयांची रक्कम ठेविली. किती आशेनें, उत्साहानें व अभिमानानें गोपाळराव रत्नागिरीला गेले.

पण त्यांच्या त्या साऱ्या आशेवर, उत्साहावर व अभिमानावर त्यांच्या चुलत्यानें पाणी पाडलें. त्यानें गोपाळरावांना कांहींही मदत केली नाहीं. तरी गोपाळरावांचा निश्चय ढळला नाहीं. तेथेंच राहून चार लोकांकडे जाऊन त्यांनीं वार लावले, घरांतील कामें केलीं आणि अभ्यासास सुरुवात केली. पण लोक त्यांच्याकडून इतकीं कामें करून घेत कीं त्यांना अभ्यासाला वेळच उरत नसे. मग रत्नागिरींत राहून काय करावयाचें? नुसतें जगणें हें कांहीं त्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ध्येय नव्हतें. त्यांना पुष्कळ शिकावयाचें होतें, ज्ञान मिळवावयाचें होतें, विद्वान व्हावयाचें होतें.

गोपाळराव कराडला परत आले. तेथील एका दवाखान्यांत त्यांनीं कंपौंडरची नोकरी धरली. त्या वेळीं त्यांचें वय पुरतें सोळाही नव्हतें. त्यामुळें दवाखान्यांतील प्रेतांची चिरफाड पाहून त्यांना शिसारी आली. अन्न नकोसें झालें आणि स्वप्नांत प्रेत नाचूं लागलें. त्यामुळें त्यांनीं त्या नोकरीला रामराम ठोकला.

रत्नागिरीच्या काकानें नाहीं म्हटलें तर म्हटलें, अकोल्याच्या मामाकडे तर जाऊन पाहूं, असा विचार गोपाळरावांनीं केला. त्यांनीं विद्येसाठीं कोंकणाचें एक टोक गांठलें होतें आणि आतां ते वऱ्हाडांत जाण्यास तयार झाले. अकोला येथें त्यांचे थोरले मामा होते. त्या मामांच्या घरीं राहून गोपाळराव १८७२ च्या जूनपासून तेथील हायस्कुलांत जाऊं लागले. त्या हायस्कूलचे हेडमास्तर रा. ब. महाजनी हे फार विद्वान व प्रेमळ गृहस्थ होते. त्यांची ह्या बुद्धिमान् विद्यार्थ्यावर कृपादृष्टि होती. त्या वेळीं गोपाळराव कसे दिसत, कसे वागत, ह्याचें वर्णन त्या प्रेमळ गुरुजींनीं यथार्थ केलें आहे. ते लिहितात, " गोपाळरावांचें वय ह्या वेळीं पंधरासोळा वर्षांचें होतें. अंगयष्टि उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार होते. भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें होतें. स्वभाव मनमिळाऊ, लोकांच्या उपयोगी पडणारा असा होता. बुद्धि चपळ व ग्राहक होती. स्मृति मध्यमावर. शब्दापेक्षां अर्थाकडे लक्ष विशेष होतें. अभ्यासावर लक्ष फार. वेळ फुकट दवडावयाचा नाहीं, असा निश्चय. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
****

अकोल्यास गोपाळरावांचें ठीक जमलें होतें. शिक्षण नीट चाललें होतें. पण तेथल्या मामांच्या पाठीमागेंही दारिद्र्याचा ससेमिरा होताच. त्यामुळें त्यांना गोपाळरावांना ठेवून घेणें जमेना. स्वाभिमानी गोपाळरावांनीं अकोला सोडलें. ते पुण्याला आले, ह्याला भेट, त्याला भेट, असें करीत हिंडले, पण कोठेंच कांहीं सोय लागेना. पुण्यांतून त्यांना परत जावें लागलें. किती कष्टी मनानें व निराश अंतःकरणानें ते परत अकोल्यास गेले असतील! कशींबशीं तीन वर्षें त्यांनीं तेथें काढलीं. अखेर १८७५ सालीं, म्हणजे वयाच्या एकोणिसाव्या वर्षी, ते मॅट्रिकमध्यें उत्तीर्ण झाले. दारिद्र्यावर मात करून मिळविलेलें त्यांचें हें यश अलौकिकच होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्येचें शिवार

एकच सदरा !—दिवसभर अंगांत घालावयाचा आणि रात्रीं धुऊन वाळत टाकावयाचा. दुसऱ्या दिवशीं पुनः तोच सदरा. आणि तिसऱ्या, चौथ्या, पांचव्या .... सर्व दिवशीं ! ही एक आगरकरांच्या राहाणीची निशाणी होती. त्यांच्या गरिबीची ही जणूं पताकाच होती !

अशा कंगाल स्थितींतही गोपाळरावांचें मन आनंदी व उत्साही होतें. कारण, ते आतां उच्च शिक्षण घेत होते. मोठ्या प्रयासा-सायासानें ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत दाखल झाले होते. ते कसेबसे मॅट्रिक झाल्यावर, त्यांना त्यांच्या सर्व आप्तांनीं एकच पोक्त सल्ला दिला. तो कोणता ? तर, 'कॉलेजचा नाद सोडा !' त्यांचें म्हणणें चुकीचें काय होतें ? त्या वेळीं पुण्यास फक्त एकच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कॉलेज होतें आणि तें म्हणजे डेक्कन कॉलेज. तेथें दरमहा वीस-पंचवीस रुपयेपर्यंत खर्च येई. तेव्हांच्या मानानें तो किती जबरदस्त खर्च ! केवळ श्रीमंत पालकांनाच झेपेल असा. तेवढ्या पैशांत दहा माणसांचा संसार सुखानें चालत असे. फक्त सरदार-इनामदार किंवा रावसाहेब-रावबहादुर अशा लक्ष्मीपुत्रांच्या मुलांनाच डेक्कन कॉलेजांत प्रवेश करणें सुलभ होतें.

आणि गोपाळराव तर त्यांच्या अगदीं उलट टोकाला. अकोल्याचे मामाही अधिक मदत करूं शकत नव्हते. इतर नातलगांकडे नन्नाचा पाढाच. पण गोपाळरावांची भरारी कांहीं विलक्षणच. विद्वान होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा गगनाला भिडलेली. डोंगरांतून उगम पावलेली नदी थेट सागरालाच जाऊन मिळावयाची. वाटेंत दगड, धोंडे, खडक, डोंगर,—कोणतेही आणि कितीही अडथळे आले, तरी ते डावलून वा फोडून ती पुढें आणि पुढेंच जाणार. तशीच गोपाळरावांची विद्यार्जनाची महत्त्वाकांक्षा.

त्यांनीं आपल्या मनगटाच्या बळावर पुढील मार्ग कापण्याचें ठरविलें. अकोला येथील 'वऱ्हाड समाचार' ह्या वर्तमानपत्रांत ते नियमित लेख लिहूं लागले आणि त्याचा मोबदला म्हणून दरमहा पांच रुपये मिळवूं लागले. ही कुमक सहा महिने मिळत होती. ते हुशार असल्यामुळें, डेक्कन कॉलेजांतील एक शिष्यवृत्तिही त्यांनीं पटकावली. आणखी कोठून पैसे मिळवितां येतील ? गोपाळरावांचें महत्त्वाकांक्षी मन शोध घेऊं लागलें. कोणींसें त्यांना सांगितलें, कॉलेजनें निबंधाची चढाओढ लावली आहे. बस् ! त्यांना पैसे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळविण्याचा एक मार्ग सापडला. त्यांनीं त्या चढाओढींत भाग घेतला आणि त्यांत बक्षीस मिळविलें. त्या बक्षिसाच्या पैशांवर कांहीं दिवस गुदरले. पण पुढें काय? पुन्हा प्रश्नचिन्ह! पण कर्त्याला मार्ग नाना. पुणें शहरांत वक्तृत्वाची चढाओढ होती, असें त्यांच्या कानीं आलें. ते तिकडे धावले. त्यांत भाषण करून ते विजयी झाले. पन्नास रुपयांचें बक्षीस मिळालें.

पण दारिद्र्यानें फाटलेल्या परिस्थितीला अशीं ठिगळें लावून काय होणार? खर्चाची मागणी वाढत होती आणि जमेची बाजू अगदीं रोडावलेली होती. चार तोट्यांनीं पाणी बाहेर काढणाऱ्या हौदासारखीच त्यांची परिस्थिति होती. खर्च मोठा पण आवक तुटपुंजी. कॉलेजचें महागडें शिक्षण त्यांच्या परिस्थितीच्या हिशेबांत बसतच नव्हतें. म्हणून त्यांच्या अनुभवी आप्तांनीं व्यावहारिक सल्ला दिला होता, 'कॉलेजचा नाद सोडा.' तेव्हां गोपाळरावांनीं ठाम उत्तर दिलें, 'मी डिग्री घेतल्यावांचून राहाणार नाहीं.'

पदवीधर होण्याची गोपाळरावांची अगदीं ध्रुवप्रतिज्ञा होती. मॅट्रिक होण्यापूर्वी अकोल्याच्या शाळेंत असतांना एकदा घरच्या कामामुळें गोपाळरावांना वर्गांत जाण्यास उशीर झाला. तेव्हां त्यांच्यावर ममता करणारे गुरुजी श्री. महाजनी चेष्टेनें म्हणाले, "तुमचा काय अभ्यास होणार? तुम्ही असेच रखडत पडणार." गोपाळरावांच्या स्वाभिमानाला हा दंश झाला. त्यांच्या महत्त्वाकांक्षेला चिडविल्यासारखें झालें. ते ताडकन् उत्तरले, "मी आपल्यासारखा एम्. ए. झालों, तरच नांवाचा आगरकर." हें बाणेदार व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

आत्मविश्वासाचें उत्तर ऐकून गुरुजींना गुदगुल्या झाल्या. ते हसतमुखानें गोपाळरावांकडे पाहात राहिले. मनांतल्या मनांत त्यांनीं त्यांना शाबासकी दिली. नुसती शाबासकीच नव्हे, तर डेक्कन कॉलेजला जाण्यासाठीं गोपाळराव निघाले असतां, साठ रुपयांची पुंजीही त्यांच्या हवालीं केली.

अशा प्रेमळ गुरुजींच्या दमतीवर आणि स्वतःच्या मर्दुमकीवर गोपाळरावांनीं पहिल्या वर्षाचा अभ्यास तर रेटला. परीक्षेच्या उंबरठ्यापर्यंत ते येऊन पोचले. तो उंबरठा ओलांडायला ते किती उत्सुक होते ! पण त्यांच्याजवळ परीक्षेची फी भरण्यास पैसे कोठें होते ? मागावेत तरी कोणाजवळ ? स्वावलंबन हेंच अखेरचें साधन.

त्यांनीं एक नाटक लिहिण्यास घेतलें. हें आपण लवकर पुरें करूं आणि त्याच्या मोबदल्यांतून परीक्षेची फी भागवूं असा त्यांचा विचार. पण काम करणाऱ्याला देव हात देतो म्हणतात. असे मदतीचे हात गोपाळरावांना पूर्वी दोनदा लाभले होते. ते रत्नागिरीला निघाले असतांना कराडच्या मुनसफांनीं त्यांना पाऊणशें रुपये दिले होते आणि डेक्कन कॉलेजकडे ते चालले असतांना अकोल्याचे महाजनी ह्यांनीं साठ रुपये दिले होते. तसाच तिसरा वाली त्यांना डेक्कन कॉलेजांत भेटला. तो म्हणजे गणिताचे प्रोफेसर केरूनाना छत्रे.

ते जितके विद्वान् होते, तितकेच प्रेमळ होते. गरीब विद्यार्थ्यांसाठीं त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटे. त्यांना कोणीं सांगितलें, " हा आगरकर फार हुशार आहे ; पण परीक्षेची फी भरतां येत नाहीं म्हणून अडचणींत सापडला आहे. ती अडचण भागविण्यासाठीं आपला अभ्यासाचा वेळ मोडून तो नाटक लिहीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे." केरूनानांचें हृदय गहिंवरलें. त्यांनीं लगेच गोपाळरावांची परीक्षेची फी स्वत: भरली. त्यामुळें गोपाळरावांना अभ्यास करण्यास मोकळा वेळ मिळाला. सहजच ते कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले.

अशीच मजल दरमजल करीत गोपाळरावांनीं कॉलेजच्या शिक्षणाचा किल्ला सर केला. इतिहास, तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र ह्यांचा त्यांनीं खोल अभ्यास केला. मिल्, गिबन्, वगैरे पाश्चात्य ग्रंथकारांचे ग्रंथ वाचण्यांत ते रंगून गेले. १८७८ सालीं, नोव्हेंबर महिन्यांत बी.ए.ची परीक्षा ते दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. लगेच त्यांना कॉलेजांत फेलो (उपप्राध्यापक) नेमण्यांत आलें. त्याचें वेतन म्हणून त्यांना दरमहा पंचाहत्तर रुपये मिळूं लागले. पदवी मिळाली, नोकरी मिळाली – त्यामुळें गोपाळरावांना किती कृतार्थता वाटली असेल! इतकी संपन्नता त्यांच्या वांट्यास आतांपर्यंत कधींच आली नव्हती.

पण ते तेथेंच थांबले नाहींत, विश्रांति घेत राहिले नाहींत, ऐषआराम करीत बसले नाहींत. त्यांचा विवाह १८७७ सालीं झाला. आतां ते इतर पदवीधरांप्रमाणें आपला संसार सुखासमाधानानें चालवूं शकले असते. पण त्यांचें मन गरुडाचें होतें. – घराच्या लहानशा घरट्यांत तें अडकून पडूं इच्छीत नव्हतें. विद्येच्या आकाशांत उंच उंच भराऱ्या मारण्यास तें उत्सुक होतें. त्यांना आपले गुरु महाजनी ह्यांच्याप्रमाणें एम्. ए. व्हावयाचें होतें. ते एम्. ए. ला बसले, एकदा नापास झाले, पुनः बसले आणि १८८० च्या नोव्हेंबर महिन्यांत एम्. ए. झाले !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या वेळच्या एम्. ए. पदवीधरांना बड्या पगाराची व मोठ्या मानाची सरकारी नोकरी चुटकीसरशीं मिळे. एम्. ए. ची पदवी म्हणजे जणूं कांहीं अल्लाउद्दिनाची रत्नामाणकांनीं भरलेली गुहा उघडावयाची किल्लीच. गोपाळरावांच्या पत्नीला सुखी जीवनाची किती आशा वाटली असेल ! आणि आईला ? तिनें तर स्वतः गरिबी सोसलेली आणि अगदीं लहानपणापासून गोपाळरावांना गरिबीचे कांटे कसे बोचत होते हें प्रत्यक्ष पाहिलेलें. त्यामुळें तिला मोठी आशा कीं आतां आपल्या मुलाला सुखाचें, वैभवाचें आयुष्य लाभेल.

पण गोपाळरावांनीं कॉलेजांत फेलो होतांच आपल्या आईला पत्र लिहून स्पष्टपणें कळविलें होतें कीं " आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी मिळेल आणि आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील. पण मी आत्तांच सांगून टाकतों कीं विशेष संपत्तीची हाव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून, सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



देशभक्तांची जोडी

तो काळ पारतंत्र्याचा होता. त्यामुळें साऱ्या देशांत शिक्षण नाहीं, आरोग्य नाहीं, ऐश्वर्य नाहीं, अशी दुर्दशा उडालेली होती. शेती असो, व्यापार असो, उद्योगधंदे असोत – सर्वत्र भारताची अधोगति होत होती. वरिष्ठ नोकऱ्या, लष्करी जागा, सत्तेचीं स्थानें, – सर्वांचीं दारें हिंदी तरुणांना बंद झालेलीं होतीं. व्यापाराच्या निमित्तानें, पेन्शनच्या रूपानें, व्याजाच्या मिषानें – नाना रीतींनीं भारताचें शोषण चाललेलें होतें. राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अशा चारी मार्गांनीं हिंदुस्थान देश पोखरला जात होता. जनतेचें वैभवच काय, पण तिचें मनोधैर्य, महत्त्वाकांक्षा व स्वाभिमान ह्यांनाही खग्रास ग्रहण लागूं पाहात होतें. 'अन्न! अन्न!' करीत लाखों – कोडो हिंदी लोक मृत्यूकडे धाव घेत होते. ही आपल्या देशबांधवांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुर्दशा, शिक्षणानें डोळे उघडलेल्या विचारी लोकांना दिसत होती; पण ही दुर्दशा नष्ट करावयाची कशी?

हीच चिंता आगरकरांच्या मनाला जाळीत होती; अगदीं कॉलेजांत असल्या वेळेपासून. ते कॉलेजांत गेले, त्याच वर्षीं त्यांची भेट 'निबंधमाला' कार विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्यांशीं झाली. चिपळूणकर हे त्यांच्यापेक्षां सहा वर्षांनीं वडील. आगरकर कॉलेजच्या पहिल्या वर्षांत असतांना त्यांना भेटले. त्या वेळेस चिपळूणकर बी. ए. होऊन सहा वर्षें झालेलीं. निद्रिस्त महाराष्ट्राला जागें करण्यासाठीं विजेचे धक्के देणारी 'निबंधमाला' त्यांनीं काढली, त्यालाही दोन वर्षें होत आलेलीं. अशा थोर देशभक्ताकडे आगरकर आपला एक राजकीय विषयावरील निबंध दाखविण्यासाठीं गेले होते. त्या भेटींत दिसून आलेला 'माला'कारांचा जाज्वल्य देशाभिमान आणि भाषाभिमान ह्यामुळें आगरकरांना त्यांच्याविषयीं आदर वाटूं लागला.

आपणही स्वतःच्या टीचभर संसारांत गर्क न होतां मालाकारांप्रमाणें साऱ्या देशाचा संसार पाहावा, आपल्या देशबांधवांना शहाणें करून सोडावें आणि त्यांची दुर्दशा थांबवावी, हाच एक विचार आगरकरांच्या चित्तांत उसळी मारूं लागला. त्या विचाराला साथ देणारा सहकारीही त्यांना १८७९ सालीं लाभला. एम्. ए. साठीं आगरकर डेक्कन कॉलेजांत फेलो म्हणून अभ्यास करूं लागले, त्याच वर्षीं एल्एल्. बी. साठीं टिळक तेथें दाखल झाले. दोघांचींही मनें ध्येयवादानें भारलेलीं. एकच विचार – आणि तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

देशहिताचा – दोघांच्याही हृदयांत विजेप्रमाणें सारखा खेळत होता. अभ्यास आटोपला कीं ह्याच विचाराचा खल ते करीत. गप्पा छाटण्यांत, पत्ते कुटण्यांत किंवा झोपा काढण्यांत त्यांना गोडी वाटत नव्हती. दिवस असो, रात्र असो, तासन् तास त्यांची हीच चर्चा. 'आपला देश वर कसा येईल?' हेंच एक कोडें सोडविण्याचा त्यांना निदिध्यास!

एकदा थंडीचे दिवस होते. रात्र पडली. आगरकर व टिळक चिपळूणकरांकडे गेले होते. तेथें राष्ट्रसेवेची चर्चा करतांना घड्याळाकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. मध्यरात्र झाली आणि मग थंडींत कुडकुडत टिळक व आगरकर डेक्कन कॉलेजांत परत गेले. पुन्हा एकदा पुणें लष्करांत ते असेच कोणास भेटावयास गेले. बोलतां बोलतां रात्रीचे दोन वाजले. परत येतांना त्यांची वाट चुकली. डेक्कन कॉलेजांत जाण्याऐवजीं ते बंडगार्डनला जाऊन पोचले. पण त्या बागेंतील रंगीबेरंगी फुलांचे विविध सुगंध त्यांचें मन मोहूं शकले नाहींत. त्यांच्या मनाची व शरीराची धावपळ एकाच कार्यासाठीं चाललेली होती. देवाच्या दर्शनासाठीं तुकाराम-महाराज जसे घरदार सोडून, व्यापारधंदा टाकून, भंडाऱ्याच्या डोंगरावर बसत, रानोमाळ हिंडत, पायाची चाळण करीत, दगडाचे टाळ वाजवीत आणि आपल्या विठोबाला अत्यंत आर्त हाक मारीत, त्याच तळमळीनें, त्याच निदिध्यासानें टिळक-आगरकरांची जोडी देशाच्या उद्धाराचा विचार करीत होती. त्यांना राष्ट्रीय मोक्ष हवा होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

हा राष्ट्रीय मोक्ष कसा लाभेल ? ह्या एका प्रश्नाचीं दोन उत्तरें त्या दोघांना सुचत. टिळक म्हणत, 'आधीं हें पारतंत्र्य जाऊं दे म्हणजे मग येथल्या साऱ्या गोष्टी सुरळीतपणें चालूं लागतील. आपल्या देशांतून इंग्रजांची सत्ता गेली आणि आपल्या राज्यकारभाराचे आपणच धनी झालों म्हणजे शेती, व्यापार, शिक्षण, आरोग्य, वगैरे सर्व बाबतींत आपण भराभर सुधारणा करूं. घड्याळाची किल्ली एकदा आपल्या हातीं आली म्हणजे त्याचे कांटे फिरविण्यास काय वेळ लागणार ?' राजकीय स्वातंत्र्यच आधीं मिळविलें पाहिजे असा टिळकांचा आग्रह. राजकीय स्वातंत्र्य आगरकरांनाही हवेंच होतें, पण तें स्वातंत्र्य मिळविण्याची, चालविण्याची व टिकवण्याची शक्ति व बुद्धि आपल्या समाजांत प्रथम उत्पन्न झाली पाहिजे असें त्यांचें मत. जोंपर्यंत आपल्या समाजांत शिक्षणाचा प्रसार झालेला नाहीं, स्पृश्यास्पृश्यासारखे उच्च-नीच भेद गेलेले नाहींत, प्रौढ-विवाह व पुनर्विवाह रूढ झालेले नाहींत, तोंपर्यंत आपला अडाणी व विस्कळीत समाज स्वातंत्र्य मिळविणार कसा ? आणि मिळविलें तरी टिकविणार कसा ? असे प्रश्न आगरकर करीत. दोघेही बुद्धिमान्, आग्रही आणि वादविवादपटु. त्यामुळें कॉलेजांत असतांना रात्रीच्या रात्री ह्या विषयांवर त्यांचे संवाद चालत. ते कोणत्या पद्धतीनें चालत असत ह्याची चुणूक कळण्यासाठीं पुढील छोटासा नमुना पाहा.

आगरकर : मला राजकीय सुधारणांऐवजीं सामाजिक सुधारणा करणेंच आमचें आद्य कर्तव्य आहे असें वाटतें. अगोदर घर नंतर दार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टिळक : अहो, घर कोणाला नको असतें ? आगरकर, 'घर सुधारा ! घर सुधारा !' असा डांगोरा तुम्ही पिटविणार ना ? पिटवा कीं, आनंदानें पिटवा, जोरजोरानें पिटवा, पण मला तर घरच नाहीं.

आगरकर : आम्ही आमच्या घराकरितां झगडूं. पण टिळक, आम्हांला सरकारबरोबर आमच्या अज्ञानाशींही झगडावें लागेल. झगडाल तुम्ही ?

टिळक : ती हृदयाची जखम आहे. तेथें मी गोड बोलून, किंवहुना मुळींच न बोलतां, नुसत्या आचारानेंच जखम भरून काढीन. आपणा दोघांना सर्वांगीण शिक्षण हातीं घ्यायला हरकत नाहीं ना ?

आगरकर : मुळींच नाहीं. ठरलें. आमच्या देशाचें शिक्षण आम्हींच हातीं घ्यायचें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



प्राचार्यांचें पद

दोघा तरुण देशभक्तांचें साध्य ठरलें व साधनही ठरलें. तारीख १ जानेवारी १८८० रोजीं 'न्यू इंग्लिश स्कूल' उघडण्यांत आलें. त्यांच्या देशसेवेचें हें पहिलें पाऊल होतें. आगरकरांचे मामा त्यांना म्हणाले होते, 'तूं सवजज्ज हो.' आगरकरांनीं त्या सल्ल्याकडे पाठ फिरवली. सरकारी नोकरी न पत्करतां, देशसेवेंतच आयुष्य घालविण्याचा निश्चय त्यांनीं केला. त्यांच्या मनाची पक्की खात्री होऊन चुकली कीं 'आपल्या देशाची दुर्दशा होण्यार्चीं दोन मुख्य कारणें म्हणजे पारतंत्र्य व दारिद्र्य. तीं नष्ट करण्याचे प्रमुख उपाय म्हणजे शिक्षण व उद्योगधंदे ह्यांची वाढ.' शिक्षणाचें हें क्रांतिकारक स्वरूप त्यांनींच पुढील शब्दांनीं वर्णन केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

" अवनत राष्ट्राचें बौद्धिक, नैतिक आणि धार्मिक पुनरुज्जीवन करून, धीमेपणानें आणि शांततायुक्त क्रांतीच्या मार्गानें त्याला बहुतेक पुढारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीला आणून बसविणें हें कार्य केवळ शिक्षणानेंच घडून येतें. "

पण हें शिक्षण कोणतें ? इंग्रज सरकारच्या शाळांतून शिक्षण मिळतच होतें, पण तें निर्जीव होतें, गुलामगिरी वाढविणारें होतें. टिळक-आगरकरांना शिक्षण हवें होतें, तें 'लोकांत स्वतंत्र विचार उत्पन्न होऊन स्वोन्नतीचे मार्ग लोकांना दाखविण्यासाठीं.' ह्या उच्च ध्येयानें चिपळूणकरांनीं न्यू इंग्लिश स्कूल काढलें व त्याच ध्येयानें टिळक-आगरकर त्या शाळेला जाऊन मिळाले. १८८० सालीं नोव्हेंबर महिन्यांत आगरकर एम. ए. झाले आणि लगेच न्यू इंग्लिश स्कूलमधील शिक्षकाच्या खुर्चीवर जाऊन बसले. त्यांचें उदाहरण पाहून प्रिं. आपटे वगैरे हुशार तरुणही शाळेला येऊन मिळाले. असे ध्येयवादी व विद्वान शिक्षक लाभल्यामुळें शाळेचा उत्कर्ष होत गेला. हां हां म्हणतां विद्यार्थ्यांची संख्या वाढली. मॅट्रिकच्या परीक्षेंतील यशाचे 'सोन्याचे कळस' त्यांतील विद्यार्थ्यांनीं कापून आणले. " हिच्या तोडीची एकही शाळा मला सबंध हिंदुस्थानांत दिसून आली नाहीं.' अशी प्रशंसा गव्हर्नर वगैरे सरकारी अधिकाऱ्यांनींही केली.

आगरकरांचें शिकविणें सर्वसामान्य विद्यार्थ्यांनाही झेपण्यासारखें असे. इतिहासासारखा रुक्ष विषयसुद्धा आगरकर गोडीनें व गमतीनें शिकवीत. विद्यार्थ्यांनीं कांहींही शंका विचारल्या तरी त्यांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाधान ते शांतपणानें करीत. स्वतः दम्यानें जर्जर झाले असतांही त्यांच्या प्रसन्न मुद्रेंतून विनोदाचे तुषार उडत असत. इंग्रजी साहित्य शिकवितांना तर त्यांच्या वाणीला भरती येत असे. मेकॉलेचीं फक्त अकरा पानें शिकविण्यास आगरकरांना संबंध एक वर्ष लागलें. 'रासेलस' च्या एका वाक्यावर एक आठवडा त्यांनीं खर्ची घातला. तासाच्या टोल्याचें भान आगरकरांना सहसा राहात नसे.

विद्यार्थ्यांना नवीन मतें, नवीन तत्त्वें, नवीन विचार सांगतांना आगरकरांना विलक्षण स्फुरण चढे व त्यांच्या चेहेऱ्यावर सात्त्विक आनंदाची लकेर झळके. विद्यार्थ्यांच्या मठ्ठपणामुळें त्यांना अतिशय राग आला तर टेबलावर बुक्की आपटून ते एवढेंच म्हणत, 'तुला ह्या गोष्टी आज समजत नाहींत, पण पुढें कळून येतील.' राग आल्यानंतर दोन मिनिटांच्या आंतच आपल्या विशाल मिशांतून ते फार गोड हसत. त्याबरोबर सर्व मुलांचें हास्य मिसळलें जाऊन साऱ्या वर्गांत निर्भेळ आनंद पिके.

शाळेचा विकास एकसारखा होत होता. त्याचें फल म्हणजे पांच वर्षांनंतर, १८८५ सालीं, जानेवारी महिन्यांत फर्ग्युसन कॉलेज निघालें. त्याचे पहिले प्राचार्य वामनराव आपटे होते. ते १८९२ सालीं वारले. त्यानंतर आगरकरांचीच प्रिन्सिपल म्हणून नेमणूक झाली. आगरकर १८८५ सालीं न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट झाले होते. त्याच्यापुढील स्थान – किंबहुना त्या शिक्षणक्षेत्रांतील अत्युच्च पद – म्हणजे कॉलेजची प्रिन्सिपलशिप.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिची माळ आगरकरांच्या गळ्यांत पडली. मुंबई विश्वविद्यालयाचे फेलोही ते त्याच वर्षी झाले. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज ह्यांमध्यें मागासलेल्या जातींतील विद्यार्थ्यांना विशेष साहाय्य करण्याचा उपक्रम आगरकरांनीं सुरू केला.

१८९५ सालीं, गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर, फर्ग्युसन कॉलेज आपल्या नव्या इमारतींत गेलें. मुंबईचे गव्हर्नर, कोल्हापूरचे छत्रपति, डेक्कन कॉलेजचे प्रिं. सेल्बी, इत्यादि थोरामोठ्यांनीं कॉलेजवर, तें चालविणाऱ्या शिक्षण-संस्थेवर आणि त्या संस्थेंतील तरुण कार्यकर्त्यांवर प्रशंसेचा नुसता पाऊस पाडला. आगरकरांना अपरंपार आनंद वाटला. तसा आनंद दुसऱ्या कोणास वाटणार? स्वतः ज्यानें शिक्षण मिळविण्यासाठीं, दीडशें मैल पायीं प्रवास केला, घरोघर वार लावले आणि एकाच सदऱ्यावर दिवस काढले, त्या गोपाळरावांना आपण हजारों गरीब व मागासलेल्या विद्यार्थ्यांना सरस्वतीच्या राज्यांत प्रवेश करून देण्यास कारणीभूत होत आहोंत, ह्यामुळें केवढा हर्ष वाटला! ह्या दृष्टीनें त्यांचें जीवन कृतार्थ झालें.

फर्ग्युसन कॉलेजचें प्रिन्सिपलपद ही केवढ्या मानाची जागा! पण आगरकरांची राहाणी अगदीं साधी होती. एकदा काय घडलें —

"अहो आगरकर कुठें आहेत?"

"कां? आपलं त्यांच्याशीं काय काम आहे?"

"काम कांहीं विशेष नाहीं, पण त्यांची कीर्ति सारखी ऐकतों आहें, तेव्हां म्हटलं, त्यांना समक्ष पाहावं एकदा."

"असं होय? तर मग मीच तो आगरकर." फर्ग्युसन कॉलेजच्या आवारांतील आपल्या घराच्या एका लहानशा खोलींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आगरकर बसले होते. सकाळची वेळ असल्यामुळें ते पंचा नेसले होते. वारा लागूं नये म्हणून दुसरा एक पंचा त्यांनीं डोकीस गुंडाळला होता. दम्याची व्यथा असल्यामुळें वैद्यांनीं सांगितलेली औषधी मिसळून ते चिलमींतून तंबाखू ओढीत होते.

उंच शरीरयष्टि, भरदार छाती, विशाल मिशांचा लांबट चेहेरा, किंचित् खोलगट अशा बारीक डोळ्यांच्यामधील नकटें नाक, एकबोटी तिरपें गंध असलेलें रुंद कपाळ, डोक्यावर बहुशः काळी पगडी, अंगांत वनातीचा हरिदासी पद्धतीचा अंगरखा, त्यावरून उजव्या काखेतून आणि डाव्या खांद्यावरून घेतलेलें उपरणें, असें बाह्यस्वरूप फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपलचें असेल असें कोणास वाटेल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



आद्य केसरीकार

काळाप्रमाणें युद्धाचीं साधनें बदलतात. अर्जुनाला कौरवांशीं संग्राम करावयाचा होता तेव्हां त्यानें गांडीव धनुष्य हातीं घेतलें; शिवाजीला मुसलमानी सत्तेशीं सामना द्यावयाचा होता, तेव्हां त्यानें भवानी तलवार उचलली; टिळक-आगरकरांना इंग्रजांच्या साम्राज्यसत्तेशीं लढा द्यावयाचा होता, पण कोणत्या साधनांनीं ?

शिक्षण हें तर एक प्रभावी शस्त्र होतेंच. त्यामुळें भावी पिढी ज्ञानानें, स्वाभिमानानें व स्वातंत्र्य-लालसेनें रसरसलेली होईल असा आत्मविश्वास आगरकर-टिळकांना वाटत होता आणि त्याच धोरणानें ते शाळेंत काम करीत असत ; पण त्यांना पारतंत्र्याशीं चाललेल्या आपल्या युद्धाची दुसरी आघाडी उघडणेंही जरुरीचें वाटूं लागलें. ही दुसरी आघाडी म्हणजे वर्तमानपत्राची.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
****

वर्तमानपत्रें हीं आगरकर-टिळकांचीं पैसा कमाविण्याचीं साधनें नव्हतीं किंवा आपल्या साहित्य-सेवेचें क्रीडांगण म्हणूनही त्यांनीं तीं काढलीं नव्हतीं. वर्तमानपत्रें चालवून संपत्ति मिळवावी, कीर्ति कमवावी, पांडित्याचें प्रदर्शन करावें, इत्यादि वैयक्तिक लालसेमध्यें त्यांचें मन गुंतलेलें नव्हतें. त्यांचीं वर्तमानपत्रें म्हणजे राष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांतील त्यांचीं हत्यारें होतीं. तीं हत्यारें चालवितांना त्यांना घाम गाळावा लागत होता, स्वतःचा पैसा खर्चावा लागत होता, आपल्या अंगावर जखमा सोसाव्या लागत होत्या. त्या जखमांतून वाहाणारें रक्त ते आनंदानें पुसत होते व पुढील मजल मारीत होते. शाळेबाहेर लक्षावधि तरुण आहेत, ते गुलामगिरींत पिचत आहेत; त्यांना स्वातंत्र्याचें ध्येय कोण दाखविणार? पारतंत्र्याची चीड त्यांच्या अंतःकरणांत कोण पेटविणार? त्यासाठींच आगरकर-टिळकांनीं वर्तमानपत्रांची मशाल हातीं धरली.

त्या वेळीं पुण्यांत चार मराठी वृत्तपत्रें चालू होतीं. त्यापूर्वी बाळशास्त्री जांभेकरांचें 'दर्पण' पत्र निघालेलें होतें. त्याच्याही आधीं 'मुंबापुर वर्तमान' हें पत्र निघालें होतें. पण त्या वेळचीं बहुतेक सारीं पत्रें विविध विषयांवरील लेख लिहून मनोरंजन करणारीं होतीं. जीं थोडीं राजकारणांत भाग घेत, तीं सरकारचा तोंडपुजेपणा करीत. स्वातंत्र्याच्या व स्वाभिमानाच्या तेजानें लखलखणारी 'निबंधमाला' विष्णुशास्त्री चिपळूणकर सहा वर्षें चालवीत होते, तरी तिचे विषय मुख्यतः तात्त्विक असत. रोजच्यारोज घडणाऱ्या घडामोडींवर सडेतोड टीका करून लोकांचीं मनें स्वातंत्र्याकडे खेचण्याचें काम करण्यासाठीं, नव्या ध्येयाचीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्या स्वरूपाचीं वर्तमानपत्रें काढण्याचा चिपळूणकर, टिळक व आगरकर ह्यांनीं निश्चयच केला.

निश्चय केला कीं तो अंमलांत आलाच, अशी तडफ ह्या तीन तेजस्वी तरुणांची होती. ता. १ जानेवारी १८८१ सालीं, 'केसरी' नांवाचें साप्ताहिक पत्र त्यांनीं काढलें. 'सदरील पत्रांतील लेख त्यास ठेवलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.' असें आत्मविश्वासपूर्ण आश्वासन त्यांनीं दिलें होतें आणि तें त्यांनीं पुढें पूर्णही केलें. दर मंगळवारची 'केसरी' ची गर्जना म्हणजे सरकारला धडकी व जनतेला स्फुरण असें झालें होतें.

'केसरी'चे संपादक आगरकर होते आणि 'मराठा' चे संपादक टिळक होते. टिळकांच्या पत्राचें नांव 'मराठा' असें जरी असलें, तरी तो इंग्रजींत निघत असे. 'केसरी' च्या आधीं दोन दिवस तो सुरू झाला. आपलें मत महाराष्ट्राबाहेरील भारतीय जनतेच्या कानींही जावें अशी उच्च महत्त्वाकांक्षा चालकांची होती. त्याबरोबरच इंग्रज अधिकाऱ्यांच्या नजरेपुढें 'केसरी' तील मराठी लेखांचीं इंग्रजी भाषांतरें जात होतीं, त्यामुळें जो गैरसमज होईल तो नाहींसा करण्यास 'मराठा' तील इंग्रजी लेख उपयोगी पडतील अशी त्यांना आशा होती. ह्या दोन्ही पत्रांत हे दोन्ही संपादक आणि त्यांचे शाळेंतील सहकारी लेख लिहीत असत.

'केसरी' वर स्वार होऊन आगरकर राजकीय, सामाजिक व धार्मिक पारतंत्र्यांशीं मोठ्या हिरिरीनें लढाई खेळत होते. 'सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंतःकरणानें लोकहितासाठीं भांडणें' हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा वाणा होता. 'केसरी' चे अंक एकापेक्षां एक तेजस्वी निघूं लागले. इतर पत्रांपेक्षां ह्या पत्राचें पाणी कांहीं निराळेंच आहे, हें महाराष्ट्रीय जनतेला कळूं लागलें. तरुण वाचकांच्या उड्या 'केसरी' वर पडूं लागल्या. त्या काळीं इतर वर्तमानपत्रांना दोनचारशें वर्गणीदार मिळण्याची मारामार; पण 'केसरी' चे तिसऱ्या वर्षीं एक हजार व सातव्या वर्षीं ४७०० वर्गणीदार झाले. आगरकर संपादकीय यशाच्या पायऱ्या भराभर चढले.

दुसऱ्याच वर्षीं 'केसरी' वर दैवानें कठोर आघात केला. तो म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांचा मृत्यु. ता. १७ मार्च १८८२ रोजीं, वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षीं, शास्त्रीबुवांनीं आपली जीवित-यात्रा संपविली. शास्त्रीबुवा म्हणजे सर्व महाराष्ट्राला स्वातंत्र्य-गंगेचे भगीरथ वाटत. आधुनिक मराठी गद्याचे तर ते जनकच. स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म ह्यांचा प्रचार त्यांच्या-इतक्या तीव्रतेनें व तळमळीनें कोणीं क्वचितच केला असेल. टिळक-आगरकरांचे तर ते सहकारी, आधार, गुरु! त्यांना शास्त्रीबुवांनीं स्फूर्ति दिली व प्रत्यक्ष कृतीची दिशाही आंखून दिली. 'आमचा धर्मराज आज स्वर्गवासी झाला' असे यथार्थ उद्गार आगरकरांनीं 'केसरीं'तील मृत्युलेखांत काढले. 'आज महाराष्ट्र-वाणीचा पति परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली' असा दुःखाचा टाहो त्यांनीं फोडला. त्यांचे एकएक गुण आठवून सांगतांना आगरकर म्हणतात, "सर्वांपेक्षां मराठी भाषेवर त्यांचें जें प्रेम होतें, तें कांहीं पुसूंच नये. द्रव्यासंबंधानें शास्त्रीबुवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जितके निरपेक्ष होते, तितका दुसरा पुरुष सापडणें कठीण. त्यांचा कल्पना-विहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे."

पण नुसत्या जुन्या आठवणी उगाळीत व दुःखानें आंसवें ढाळीत हताश होऊन बसणाऱ्या विधवेप्रमाणें 'केसरी'चे हे पहिले संपादक स्वस्थ बसणारे नव्हते. शास्त्रीबुवांच्या मृत्युलेखांतच त्यांनीं अशी खंबीर ग्वाही दिली आहे कीं "शास्त्रीबुवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्हीं सर्वांनीं आरंभिलेला उद्योग अविच्छिन्न चालविण्यास, होईल तितकी खटपट करील."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुरुंगांतील तपश्चर्या

वृत्तपत्रें चालविणें म्हणजे सुळावरील पोळी होय, हें 'केसरी'नें महाराष्ट्रास दाखवून दिलें. १८५७ च्या स्वातंत्र्य-समरांत व त्यानंतरही अनेक महाराष्ट्रीयांनीं राष्ट्रभक्तीसाठीं तुरुंगवास सोसला, फटके खाल्ले, हद्दपारी भोगली किंवहुना फाशीही पत्करली; पण केवळ वर्तमानपत्र चालविल्यामुळेंच तुरुंगांत जाण्याची पाळी आली प्रथम 'केसरी' कारांवरच. त्या वेळचा तुरुंग म्हणजे साक्षात् यमपुरीच! त्यांना तोंड देण्याची पाळी आली, तेव्हां आगरकरांचें व टिळकांचें वय अवघें सव्वीस वर्षांचें होतें. ता. २४ जानेवारी १८८२ रोजीं मुंबईच्या कोर्टांत, आगरकर-टिळक प्रभृतींवर फिर्याद दाखल झाली. हा खटला ता. १५ मार्च रोजीं हायकोर्टाकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठविण्यांत आला. त्यानंतर दोनच दिवसांनीं शास्त्रीबुवा निधन पावले आणि टिळक-आगरकरांचा मोठा आधार गेला.

हा खटला कशासाठीं झाला? तर कोल्हापूरच्या छत्रपतींचा कैवार 'केसरी'कारांनीं घेतला म्हणून. कोल्हापूरचे दिवाण रा. व. बर्वे ह्यांनीं छत्रपति शिवाजीराव ह्यांना नानाप्रकारांनीं छळलें, आई—बायको ह्यांच्यापासून दूर ठेवलें, वेडे ठरविलें आणि छड्यांनीं व चाबकांनीं चोपण्यास सुरुवात केली. गोरे डॉक्टर व गोरे रखवालदार ह्यांचा पाहारा सुरू झाला. फार काय? त्यांना विष घालून ठार मारण्याचे प्रयत्नही सुरू झाल्याच्या वातम्या पसरल्या. त्या वेळीं त्या बर्वेशाहीला जाब विचारण्याचें धैर्य कोणाच्या अंगीं होतें? फक्त 'केसरी'च्याच. बर्वे ह्यांजवर टीका करणारीं झणझणीत पत्रें आगरकरांनीं 'केसरीं'त व टिळकांनीं 'मराठा' मध्यें छापलीं. बर्वे ह्यांनीं अब्रुनुकसानीची फिर्याद त्यांच्यावर केली.

न्यायमंदिरांतला न्याय पुराव्याला धरून असतो, सत्याला धरून असेलच असें नाहीं. टिळक-आगरकरांना जो पुरावा द्यावयाचा होता; तो त्यांच्या कोल्हापूरकर मित्रांनीं पुरविला नाहीं. त्यांनीं विश्वासघात केला. त्यामुळें ता. १७ जुलै १८८२ रोजीं न्यायमूर्तींनीं टिळक व आगरकर ह्यांना प्रत्येकीं चार महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली.

त्याच दिवशीं संध्याकाळीं मुंबईजवळील डोंगरीच्या तुरुंगांत आगरकर-टिळकांना घोड्याच्या गाडींतून नेण्यांत आलें. त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुरुंगांत सारे चोर-दरोडेखोर; राजबंदी असे हे दोघेच. त्यांतही आगरकरांची प्रकृति दम्यानें पोखरलेली. तुरुंगांत गेल्यावर घरचे कपडे उतरण्यांत आले. वॉर्डरनें त्यांची झडती घेतली व त्यांना तुरुंगाचे पोषाख दिले. नांवें रजिस्टर करून शिपायांनीं आगरकर-टिळकांना एका कोठडींत कोंबलें आणि दाराला जंगी कुलूप ठोकलें. त्या रात्रीं पोटांत थंडी, बाहेर थंडी व प्रकृति थंड, त्यामुळें आगरकरांनीं उजाडेपर्यंत सगळे तास मोजले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कारकुनाच्या कचेरींत त्यांचें वजन-माप व वैद्यकीय तपासणी घेण्यांत आली. दुपारीं लोखंडी टकोऱ्यांतून त्यांना जें अन्न देण्यांत आलें, त्याचा अमंगळ दर्प त्यांना दुःसह वाटला. तोंडांत दोनतीन शितें जाण्यावरोवर त्यांना ओकारीच आली. संध्याकाळीं चार वाजतां जेवण्याचा हा विधि पुन्हा झाला. कैद साधी असल्यामुळें काम कांहींच नव्हतें. पण ती अवस्थाच तापदायक होती. संध्याकाळीं पांच वाजल्यापासून दुसऱ्या दिवशीं सकाळीं सहा वाजेपर्यंत, तेरा फुटांच्या चौरस खोलींत आगरकर-टिळकांना कोंडून ठेवण्यांत येत असे. लघवी-शौचाची सोय त्याच खोलींत.

अशा पद्धतीनें कंठलेले पहिले पंचवीस दिवस त्या दोघांना पराकाष्ठेचे जड गेले. नंतर त्यांनीं अर्ज केल्यावरून त्यांना लिहिण्या-वाचण्याची परवानगी मिळाली, पण पुढें जसजशी मेंदूची व शरीराची शक्ति क्षीण होत चालली तसतसें वाचण्यावरदेखील त्यांचें मन लागेनासें झालें. शेवटच्या आठ दिवसांत तर हवीं तितकीं पुस्तकें आणि हवे तितके कागद जवळ असतांही त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक ओळ देखील वाचली नाहीं किंवा एक टाकदेखील ओढला नाहीं. पण मधल्या दोन महिन्यांत आगरकरांनीं दोन पुस्तकें लिहिलीं.

हीं दोन पुस्तकें म्हणजे 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस' व 'विकारविलसित.' डोंगरीच्या तुरुंगांत आपण व टिळक ह्यांच्यामध्यें कोणकोणते संवाद झाले, मागील आयुष्यांत कोणत्या चुका घडल्या व पुढील आयुष्यांत त्या कशा टाळाव्या, गुन्हेगारीचें मूळ कशांत आहे आणि तें नाहींसें कसें करतां येईल, इत्यादि विषय पहिल्या पुस्तकांत आहेत. दुसरें पुस्तक 'हॅम्लेट' ह्या इंग्रजी नाटकाचें भाषांतर आहे.

हॅम्लेट नाटक म्हणजे जगांतील अमर वाङ्मय होय. शेक्सपिअर हा इंग्रजांचा लाडका नाटककार. इतका कीं "वेळप्रसंगीं आम्ही हिंदुस्थानही हातचा सोडूं, पण शेक्सपिअर ? मुळींच नाहीं !" असें ते म्हणतात. त्या शेक्सपिअरनें जीं सदतीस नाटकें लिहिलीं, त्यांत चार फार गाजलीं. त्यांतही हॅम्लेट हें सर्वश्रेष्ठ. त्याचा आस्वाद मराठी वाचकांना द्यावा असें ह्या 'सरस्वतिपुत्राला' वाटलें ह्यांत आश्चर्य काय ? त्यांनीं शब्दाला शब्द ठेवून देण्याचें भाषांतरी काम न करतां सरस अनुवाद केला आहे. डेन्मार्कच्या हॅम्लेटला हिंदुस्थानांतील चंद्रसेन बनविला आहे. शेक्सपिअरचा सर्व भावार्थ जशाचा तसा मराठींत आणण्याच्या कामीं आगरकरांनीं खूप कष्ट व कौशल्य खर्च केलें आहे. भाषेचा सहजपणा हा त्यांच्या अनुवादाचा प्रमुख गुण होय. ह्या अनुवादाला त्यांनीं जी अठ्ठावीस पानांची प्रस्तावना जोडली आहे, तींत त्यांनीं शेक्सपिअरच्या वाङ्मयीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

****

योरवीची छाननी चांगली केली आहे. ती प्रस्तावना वाचली म्हणजे आगरकर शाळा-कॉलेजांत कसें शिकवीत असतील ह्याची कल्पना येते. विशेष हें कीं ह्या प्रस्तावनेंतही त्यांचीं समाजसुधारणेचीं मतें सहजगत्या येऊन गेलीं आहेत.

इंग्रजांच्या तुरुंगांत राहून, इंग्रज नाटककाराचा हा नजराणा घेऊन, आगरकर ता. २६ ऑक्टोबर १८८२ रोजीं तुरुंगाबाहेर आले. तुरुंगवासांत त्यांचें वजन सोळा पौंडांनीं घटलें. टिळकांचें वजन तर चोवीस पौंडांनीं कमी झालें.

पण ह्या दोघा देशभक्तांचें जनतेवरील वजन किती वाढलें? डोंगरीच्या तुरुंगाबाहेर त्यांचें स्वागत करण्यास मुंबईतील दोन हजारांवर माणसें गोळा झालीं. मुंबईत त्यांची मिरवणूक काढण्यांत आली, अनेक ठिकाणीं सत्कार झाले, पानसुपाऱ्या झाल्या.

आणि पुण्यपुरीला तर काय? प्रेमाचें व अभिमानाचें भरतेंच आलें. ऐतिहासिक काळांत दिल्ली जिंकून आलेल्या विजयी वीराचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जसें पुण्यांत स्वागत होई, तसें आगरकर-टिळकांचें झालें. डेक्कन कॉलेज तर त्यांचेंच. तेथें त्यांचे कैक सहकारी होते. ते खडकी स्टेशनावर गेले आणि आपल्या कॉलेजांतील ह्या पूर्वीच्या विद्यार्थ्यांचें स्वागत त्यांनीं मोठ्या हर्षानें व भक्तीनें केलें. पुणें शहरांत त्यांची मोठी मिरवणूक निघाली. आतां शास्त्रीबुवा इहलोकावर नव्हते, पण त्यांचा बंगला होता. तेंच पावनतीर्थ. तेथें पहिली पानसुपारी झाली. मोरोबादादांच्या वाड्यांत सार्वजनिक सभेतर्फे जाहीर पानसुपारी झाली. हजारों लोक जमले. त्यांनीं ह्या तरुण देशभक्तांना शतशः धन्यवाद दिले.

ह्या खटल्यांत आगरकर-टिळकांना पुष्कळ आर्थिक झीज सोसावी लागली. फेरोझशहा मेहता ह्यांच्यासारखे वकील त्यांनीं दिले होते. त्यासाठीं लागणारा पैसा ह्या दरिद्री देशभक्तांनीं कोठून उभा करावयाचा ? हा विचार करून लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें 'केसरी'च्या 'बचाव-फंडाची' कल्पना काढली. त्यासाठीं पुण्यांत नाटक करण्यांत आलें. त्यांत गोपाळराव गोखले ह्यांनीं स्त्रीभूमिका केली. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनींही आगरकर-टिळकांचा गौरव नोव्हेंबर महिन्यांत केला. त्या वेळची लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्या दोघांच्या गौरवाचें भाषण गोपाळराव गोखले ह्यांनीं केलें. तें त्यांचें पहिलेंच सार्वजनिक भाषण.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



जोडी फुटली

विष्णुशास्त्र्यांचा वैकुंठवास व डोंगरीचा तुरुंगवास ह्या दोन्ही आपत्तींपेक्षां दुःसह असें संकट आगरकर-टिळकांवर येऊन कोसळलें. हें संकट त्यांनींच आणलेलें होतें, अंतर्गत होतें, आंतड्याच्या क्षयासारखें होतें, न कळत हळुहळू वाढणारें, पण शेवटीं जीव खाणारें होतें. डेक्कन कॉलेजमध्यें विद्यार्थी असल्यावेळेपासून डोंगरीच्या तुरुंगांत बंदीवान असेपर्यंत आगरकर व टिळक हे एकत्र राहिलेले, एकाच ध्येयानें भारलेले, एकाच कार्याला वाहिलेले, जुळे भाऊच जसे कांहीं! पण भाऊ आले कीं भाऊबंदकी आली. दिवसेंदिवस काम करतां करतां दोघांचेही विचार दृढ होत गेले, मतें पक्कीं बनलीं. शेवटचा मुक्काम दूरवर असतो तोंपर्यंत सारेच सहप्रवासी. पण एकदा चाट्टं लागलें म्हणजे मग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्याच्या त्याच्या सोयीप्रमाणें, आवडीप्रमाणें निरनिराळ्या वाटा फुटतात आणि त्याला कारणें अगदीं क्षुल्लक असलीं तरी पुरेशीं होतात.

वाजीराव – चिमाजीअप्पा ह्यांची अतूट जोडी महाराष्ट्रानें पूर्वी पाहिली होती, आगरकर-टिळकांची जोडीही महाराष्ट्र आतां पाहात होता, पण ती कायम टिकली नाहीं. मूळचे स्वभाव भिन्न असले म्हणजे बाहेरची एकच घटना भिन्न भिन्न परिणाम घडवूं शकते. त्यांत दोघेही कमालीचे आग्रही. १८८४ सालीं 'बालविवाह' ह्या विषयावर पुण्यामुंबईस कडाक्याचा वादविवाद झाला. वास्तविक आगरकर काय किंवा टिळक काय, दोघेही इतके शिकलेले व नवीन दृष्टीचे होते कीं बालविवाहाची प्रथा नष्ट व्हावी ह्याबाबत त्यांचें एकमत असावें. पण ती परक्या सरकारच्या कायद्यानें नष्ट करावी कीं नाहीं, हाच वादाचा विषय होऊन बसला.

मुंबईतील मलबारी शेट ह्यांनीं सरकारला बालविवाहांचा प्रतिबंध करण्याचा कायदा करण्याविषयीं लकडा लावला. कायदा होईपर्यंत बालविवाह केलेल्या मुलाला विद्यापीठाच्या परीक्षेस बसूं देऊं नये आणि सरकारी नोकरी देऊं नये अशीही मागणी त्यांनीं केली. ह्याच्याविरुद्ध अर्ज पाठविण्यासाठीं मुंबईत एक मोठी सभा भरली. 'आमच्या समाजांतील हा दोष आमचा आम्हींच दूर केला पाहिजे, सरकारनें त्यांत हात घाल्दूं नये,' अशी उपसूचना त्या सभेंत मांडण्यांत आली, पण ती नामंजूर झाली. त्या उपसूचनेविरुद्ध 'केसरीं'त आगरकरांचा अग्रलेख आला. पण टिळकांचें मत त्याविरुद्ध होतें – म्हणजे उपसूचनेच्या बाजूनें होतें – 'आमच्या सामाजिक प्रश्नांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रज सरकारनें ढवळाढवळ करूं नये' असें होतें. म्हणून 'केसरी' च्या एकाच अंकांत बालविवाहाच्या कायद्याला अनुकूल व प्रतिकूल असे दोन्ही लेख छापून आले! त्यानंतर एका अंकांत आगरकरांनीं स्वतःच्या सहीनें एक लेख लिहिला. अशा प्रकारें 'केसरी'च्या संपादकवर्गातील मतभेद प्रकट झाले.

ह्याशिवाय दुहीचें दुसरेंही कारण निर्माण झालें, तें ह्याहून खोल होतें. जीवित-कार्य समजून त्यांनीं जी शिक्षणसंस्था काढली, तिचा पायाच हालविणारें तें होतें. आगरकर काय, टिळक काय, गोखले काय, आपटे काय – सारेच शिक्षक मोठे बुद्धिमान; सर्वजण मोठा त्याग करूनच अवघ्या तीस-चाळीस रुपयांवर संस्थेंत राहिलेले. नवीन संस्था स्थापतांना कार्याचा एक कैफ येत असतो. त्या कैफांत आपण किती त्याग करतों, किती कष्ट करतों, किती हाल सोसतों, ह्याची मनाला कांहीं तमा नसते. पण पुढें संस्थेला जरा बरी स्थिति आली म्हणजे हा कैफ उतरतो आणि मग कार्यकर्ते आजूबाजूला पाहूं लागतात. तेव्हां आपण आपल्या ध्येयासाठीं काय काय सोडलें, हें त्यांना दिसूं लागतें. मग त्यांना आपल्या संसाराची, पुढील आयुष्याची वैयक्तिक जबाबदारी जाणवूं लागते. न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांच्या बाबतींत असेंच घडलें.

आपटे-गोखले ह्यांनीं पुस्तकें लिहून आपल्या कमाईंत भर टाकली, तर आगरकरांनीं अशी सूचना मांडली, 'आमचें वेतन आमच्या गरजांप्रमाणें न ठरवितां शाळेच्या सांपत्तिक स्थितीवरून ठरवावें.' पगारवाढीची मागणीही कांहीं सभासदांनीं केली, तर कांहीं सभासदांनीं सुचविलें, संस्थेच्या स्थापनेपासून ज्यांनीं कमी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पगार घेतला असेल त्यांची भरपाई करावी. टिळकांना हें पूर्ण नापसंत होतें – त्यांना हा 'स्वार्थत्यागाचा सौदा' वाटला.

सामाजिक विषय व आर्थिक धोरण ह्या दोन्ही बाबतींत आगरकर व टिळक ह्यांचे मतभेद सारखे वाढतच चालले. त्यांचे पडसाद संस्थेच्या सभांमध्येंही उमटूं लागले. चालकामध्यें तट पडूं लागले. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप होऊं लागले. संस्थेचें सारें वातावरण कलहाच्या विषानें माखलें गेलें. त्यांत काम करणें कोणालाच सुखाचें वाटेनासें झालें. त्यांतूनही वर्तमानपत्रें म्हणजे सार्वजनिक नगारे. वैयक्तिक मतभेदाचे आवाज जनतेच्या कानीं मोठ्या स्वरूपांत जावयाचे, म्हणून 'केसरी' चें संपादकत्व सोडण्याचें आगरकरांनीं ठरविलें. १८८१ सालापासून सतत सात वर्षें आपण वाढविलेल्या व त्यापायीं तुरुंगवास भोगलेल्या 'केसरी' चा संबंध सोडतांना आगरकरांच्या हृदयाला तीव्र वेदना झाल्या. ता. २५ ऑक्टोबर १८८७ रोजीं त्यांनीं 'केसरी' सोडला. तथापि ते शाळा-कॉलेजांत काम करीत होतेच.

'केसरी' सोडल्यानंतर सुमारें एक वर्षाच्या आंत, म्हणजे १८८८ सालीं, दसऱ्याच्या दिवशीं आगरकरांनीं 'सुधारक' नांवाचें आपलें स्वतंत्र साप्ताहिक काढलें. तें मराठी व इंग्रजी ह्या दोन्ही भाषांत लिहिलें जात होतें. इंग्रजीचा विभाग गोखले लिहीत. गोपाळराव आगरकर व गोपाळराव गोखले ह्या दोघांनीं 'सुधारकांतून' आपले सामाजिक विचार निर्भीडपणें व आवेशानें मांडले. पहिल्या वर्षी ६५० वर्गणीदार मिळाले. खर्च वजा जातां चौऱ्याऐंशीं रुपये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिल्लक राहिले. म्हणजे दोघां संपादकांना प्रत्येकीं मासिक पगार साडेतीन रुपये पडला. पण ह्याबद्दल आगरकरांना काडीचें दुःख वाटलें नाहीं. 'केसरीं' तून तरी त्यांना काय मिळालें होतें? 'आतांपर्यंत मी हें काम निष्काम बुद्धीनें करीत आलों आहें आणि पुढेंही तें तसेंच करीत राहाणार.' हा त्यांचा निर्धार.

आगरकर व टिळक ह्यांच्यामध्यें विरोध वाढण्याला आणखी एक निमित्त घडलें. तें म्हणजे इंदूरच्या महाराजांनीं १८८९ सालीं ह्या दोघां देशभक्तांना आपल्या घरीं बोलावून घेतलें, त्यांच्या कर्तृत्वाचें कौतुक केलें आणि त्यांच्या गुणांचा गौरव करण्यासाठीं सातशें रुपयांची देणगी दिली. ह्या देणगींतूनच दुही वाढली. ही सर्व देणगी सोसायटीच्या सर्व सभासदांसाठीं आहे, म्हणून ती सर्वांना समप्रमाणांत वाटून द्यावी, असें टिळकांचें मत. पण देणगी दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं इंदूरच्या महाराजांकडून लिहून आलें, 'आमच्या देणगीपैकीं चारशें रुपये आगरकरांना त्यांच्या 'वाक्यमीमांसा' ह्या पुस्तकासाठीं द्यावेत.' हा बदल आगरकरांनींच घडवून आणला असावा, असा संशय टिळकांना आला. त्यामुळें ह्या दोघा जिवलग मित्रांमध्यें छत्तिसाचा आंकडा आला. ते एकमेकांचीं तोंडें पाहीनासे झाले. ह्या स्थितीला कंटाळून टिळकांनीं १८९० च्या डिसेंबरमध्यें संस्थेचा राजीनामा दिला.

आगरकर केसरींतून बाहेर पडले आणि टिळक सोसायटींतून बाहेर पडले. त्यामुळें एकत्र येण्याचे त्यांचे प्रसंग कमी कमी होत गेले. दोघेही मुंबई विद्यापीठाचे फेलो होते. त्या निमित्तानें हे दोघे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकत्र येत. पण असे प्रसंग क्वचित्. विरोधाचेच प्रसंग फार. त्याला क्षुल्लक निमित्तही पुरे. अशा अगदीं क्षुल्लक निमित्तांतूनच 'पंचहौद प्रकरण' गाजलें. पुण्यामध्यें स्वारगेटापलीकडे पंचहौद मिशन आहे. तेथें ख्रिस्ती लोकांची शाळा आहे. त्या शाळेच्या प्रमुखानें व्याख्यानासाठीं कांहीं विद्वानांना बोलाविलें. न्या. रानडे, हरिभाऊ आपटे, वगैरे बावन्न विद्वान तेथें गेले. त्यांत टिळक होते, पण आगरकर गेले नव्हते. व्याख्यानानंतर ह्या निमंत्रित पाहुण्यांना चहा देण्यांत आला. तो ख्रिस्त्याच्या हातचा चहा प्यावा कीं न प्यावा ह्याचें सर्वांना मोठें कोडें पडलें. तो काळच तसा होता. गोऱ्यासाहेबाची काळी सावलीसुद्धा अंगावर पडूं न देणारे हिंदु लोक त्या वेळीं होते. मग स्पर्श कोठला नि खाणेंपिणें कोठलें? न्या. रानडे ह्यांनीं शिष्टाचार म्हणून चहाचा पेला हातांत घेतला व खालीं ठेवला. कांहींनीं घोटभरच चहा घेतला, तर कांहींनीं मांजराप्रमाणें डोळे मिटून सारा कप झटपट फस्त केला. टिळकांनीही चहापान केलें.

ह्या 'चहाच्या पेल्यांतून' मोठें वादळ निर्माण झालें. एका उपद्व्यापी माणसानें शंकराचार्यांकडे कागाळी केली. त्यांनीं ह्या ग्रामण्य प्रकरणाचा निकाल दिला. टिळकांनीं काशीस जाऊन प्रायश्चित्त घेतल्याचा दाखला दिला, त्यामुळें ते शंकराचार्यांच्या शिक्षेपासून बचावले. पण आगरकरांच्या टीकेपासून ते कसे बचावणार? आगरकरांनीं टिळकांवर टीकेची टाकी जोरांत चालविली. 'ख्रिस्त्याच्या हातचा चहा पिऊन व स्टेशनावरील मुसलमान किंवा पोर्तुगीज मेसमनच्या हातचा भात खाऊन' टिळकांनीं धर्म बुडविला असा आरोप आगरकरांनीं केला. पण कायदेपंडित टिळकांनीं तो आरोप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परतविला. त्यांनीं मेसमनच्या हातचा भात खाल्लाच नव्हता. तेव्हां तो असत्य आरोप परत घ्यावा असें टिळकांनीं आगरकरांना बजाविलें. तेव्हां आगरकरांनीं टिळकांची माफी मागितली. 'बोलणें फोल झालें.' ह्या नांवाचा लेख लिहून आगरकर म्हणतात, 'कोल्हापूरच्या खटल्याची अदल घडली असून नुसत्या तोंडी पुराव्यावर आम्ही इतके विसंवलों, ह्याबद्दल आम्हांस मोठा विस्मय वाटतो."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



मनाचें दर्शन

एकदा गोपाळराव घरीं कांहीं वाचीत पडले होते. इतक्यांत रस्त्यावरून कांहीं आरडाओरड ऐकूं आली, तेव्हां ते खोलींतून बाहेर आले आणि माडीवरून खालीं पाहूं लागले, तों काय? आपल्या 'सुधारक' पत्राचे अंक अंथरून त्यावर आपल्याच प्रेताची प्रतिमा ठेवलेली आणि ती प्रेतयात्रा पुढें चाललेली! तिच्याबरोबर असलेलीं कांहीं मुलें व कांहीं तरुण आपल्याला तारस्वरानें शिव्या देत आहेत! तें दृश्य पाहून व ते शब्द ऐकून गोपाळरावांना काय वाटलें?

कांहीं वाटलें नाहीं. सॉक्रेटिसपासून मार्टिन ल्यूथरपर्यंत सर्व समाजसुधारकांचा छळ कसा झाला हा इतिहास त्यांनीं वाचलेला होता, शिकविला होता, किंबहुना आपल्या अंगीं मुरविलाही होता. ज्ञानेश्वरांची व एकनाथांची शांति त्यांच्या ठायीं अवतरली. प्रेतयात्रा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढणाऱ्यांच्या अज्ञानाची कींव करीत, हसत हसत, ते खोलींत गेले आणि शांतपणें वाचीत राहिले.

असाच प्रसंग क्रीडाभुवनांत घडला. तेथें सुधारकांची सभा भरली होती. समाजसुधारणेचा विषय होता. त्याला विरोध करण्यासाठीं जुन्या मताची मंडळी शेजारच्या घरावरील कौलांवर बसली होती. त्यांच्या हातांत शेणाचे गोळे व विटांचे तुकडे होते. सुधारकांची सभा सुरू होतांच त्यांनीं आपल्या त्या शस्त्रांचा मारा सुरू केला. त्यामुळें गोपाळरावांना थोडी दुखापतही झाली; तरी न रागावतां त्यांनीं सुधारकाच्या पुढच्या अंकांत लिहिलें, "शाबास! वीरांनो शाबास!! तुम्ही केवळ चालतीं बोलतीं प्रेतें आहां, असें मला वाटत होतें; पण तुमच्या ह्या आजच्या सज्जनतेवरून तुम्हांला मन आहे, तुम्हांला रागद्वेषादि मनोविकार आहेत हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें आणि आतां आमच्या ह्या हतभागी देशाचा अभ्युदयकाल फार दूर नाहीं, अशी मला आशा वाटूं लागते."

प्रत्यक्ष खुनाची धमकीही आगरकरांना अनेक वेळां आलेली होती. तरी ते शांतच. नेहमीं ते एकटेच फिरावयास जात आणि रात्र पडल्यावर घरीं येत. हा क्रम खुनाच्या धमकीनंतरही त्यांनीं चालू ठेवला. एकदा ते फिरून आल्यावर त्यांच्या पत्नीनें त्यांच्या हातीं एक लखोटा दिला. तेव्हां 'काय बुवा हें प्रकरण! ह्यांत विंचूबिंचू तर नाहीं ना? आतां तेवढंच बाकी राहिलं आहे!' असें म्हणून त्यांनीं तो लखोटा फोडला. तों त्यांतून कांहीं नोटा निघाल्या. पत्र वाचून पाहातात, तों 'सुधारका'चा प्रसार व्हावा व तो फुकट वांटतां यावा, म्हणून त्याला अल्पस्वल्प मदत दिल्याचा मजकूर होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोपाळरावांना अंतर्बाह्य शत्रु फार. गरिबी तर पांचवीला पुजलेली. दम्याचा रोग कॉलेजापासून जडलेला. संस्थेंतील भांडणें जीव खाणारीं आणि समाजसुधारणेमुळें सारे आप्त, मित्र, सहकारी विरोधक बनलेले. तरी मनाची शांति सांवलीप्रमाणें त्यांच्या सर्व जीवनाला बिलगलेली असे. विनोदही ते करीत. 'माझा कोठा म्हणजे सर्व रसायनांचा अर्क आहे' असें ते म्हणत. तसेंच 'मी मेल्यावर जर माझें पोट एखाद्या वैद्यानें ठेवून दिलें तर त्याच्या हातांत एक दवाखानाच आल्यासारखें होईल.' अशी स्वतःची चेष्टा ते करीत. 'माझ्या पावशेर मिशा मला फिल्टरसारख्या उपयोगी पडतात' असें म्हणतांना त्यांच्या विशाल मिशांतून हशा पसरे. त्यांनीं केलेली शनिरायाची आरती अशीच गमतीची आहे. त्यांत ते म्हणतात,

जे न 'सुधारका' पढतील त्यांसी
त्याची वा किंमत न देती त्यांसी ॥

राशीस येऊनी छळावें गा देवा !
वद नाहीं नामी का पत्र हें राया ॥

टिळक-आगरकरांचें वाग्युद्ध निकरावर आलें असतांना एक प्रेमळ प्रसंग घडून आला. टिळकांच्या मुलाची मुंज निघाली. टिळक आगरकरांच्या घरीं आले व म्हणाले, "गोपाळराव, तुमचे-आमचे मतभेद आहेत, असूं देत; पण माझ्या मुलाच्या मुंजीला मात्र तुम्हीं आलेंच पाहिजे. त्याचं आणि तुमचं कांहींच वाकडं नाहीं." तेव्हां ते म्हणाले, "मी मुंजीला येणारच आहें; पण तुम्हांला माहीत आहे, माझी प्रकृति ठीक नसते, शिवाय आई वारल्यापासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मी कोणाकडे जेवावयासही जात नाहीं. मीं परान्न सोडलं आहे." त्यावर टिळक हसत हसत म्हणाले, "एक पावशेर तांदूळ द्या म्हणजे झालं. जातों घेऊन ! मग कसलं आलं आहे परान्न?"

अशा शांत, विनोदी व मोकळ्या वृत्तीमुळें आगरकर सर्वांना प्रिय वाटत. ते हृदयानें अत्यंत कनवाळू होते. कॉलेजांतील विद्यार्थ्यांनाच काय, पण तिथल्या गड्यांनाही ते वात्सल्यानें वागवीत. नैतिक दृष्ट्या तर त्यांचें आचरण अत्यंत शुद्ध असे. सत्याची चाड त्यांच्याइतकी फारच थोड्या लोकांत असते. 'इष्ट दिसेल तें बोलणार आणि शक्य असेल तें करणार' हा तर त्यांच्या 'सुधारकाचा' बाणा ! त्यांच्या लेखांतून हा सत्याचा अभिमान प्रगट होतो. क्रांतिकारकाचा आवेश तर वाक्यावाक्यांतून व्यक्त होतो. त्यांच्या 'बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्यामुळें त्यांची वृत्ति आनंदमय' होती. 'मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन' करण्यासाठीं 'आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद वाटत असेल, तें दुसऱ्यास सांगावें आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें' हें त्यांच्या आयुष्याचें ध्येय होतें.

त्यांनीं हिंदुसमाजांतील अस्पृश्यता, बालविवाह, विधवावपन, वगैरे दुष्ट चालींवर कडाडून हल्ले केले आणि स्त्रियांचें शिक्षण, पुनर्विवाह, वगैरे नवीन सुधारणांचा प्रचार मोठ्या हिरिरीनें केला. त्यांच्या विचारपरंपरेंत हरिभाऊ आपट्यांसारखे कादंबरीकार, श्रीपाद कृष्णांसारखे नाटककार व केशवसुतांसारखे कवि निर्माण झाले. त्यांनीं ज्यांचा पुरस्कार केला, त्या बहुतेक सामाजिक सुधारणा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आज हिंदुसमाजानें स्वीकारल्या आहेत. औद्योगिक सुधारणांकडेही त्यांचें लक्ष असे. राजकारणांतही ते पुढारलेले विचार मांडीत असत. 'राजकीय सुधारणा सामाजिक सुधारणांच्या आधीं झाल्या पाहिजेत. राजकीय स्वातंत्र्याची जाणीव नसणें म्हणजे शरीरांतील चैतन्य नष्ट होणें होय.' अशीं स्पष्ट विधानें त्यांनीं केलीं आहेत. पण त्यांचा मुख्य भर सामाजिक सुधारणेवर. त्यासाठीं त्यांनीं आपली लेखणी तलवारीप्रमाणें चालविली.

गरिबी व रोग ह्यांनीं पोखरलेलें आगरकरांचें शरीर दिवसेंदिवस अशक्त होत चाललें. विश्रांतीसाठीं ते अकोल्यास आपल्या मामाकडे जाऊन राहिले. तेथून पुण्यास फर्ग्युसन कॉलेजच्या इमारतीच्या उद्घाटनासाठीं ते आले. त्यानंतर ते मिरजेस जाऊन राहाणार होते; पण त्यांची प्रकृति ढासळली आणि ता. १७ जून १८९५ रोजीं, वयाच्या अवघ्या एकूणचाळीसाव्या वर्षीं, त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या प्रेतयात्रेला जमलेला विद्यार्थीसमूह 'आपला प्रेमळ बाप गेला' असें समजून ढळढळा रडला. टिळकप्रभृति हजारों लोक स्मशानयात्रेंत होते. आपल्या प्रेताच्या दहनासाठीं गरीब गोपाळरावांनीं पै-पैची काटकसर करून वीस रुपयांची पुरचुंडी बांधून ठेवलेली होती. ती पाहातांच गोपाळराव गोखल्यांना रडूं कोसळलें!

सात वर्षें न्यू इंग्लिश स्कूलचे सुपरिंटेंडेंट, सात वर्षें 'केसरी'चे संपादक व सात वर्षें 'सुधारक' पत्राचे संपादक – ह्या तिहेरी नात्यानें गोपाळराव आगरकरांनीं महाराष्ट्राची फार मोठी सेवा केली. त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



त्याला बुद्धिवाद शिकविला, नवे विचार ऐकविले, शास्त्रीय दृष्टि दिली आणि मुख्य म्हणजे नीतीनें, सत्यानें व स्वाभिमानानें वागण्याचा कित्ता घालून दिला. आगरकरांचा मृत्युलेख 'केसरीं'त टिळकांनीं आपल्या डोळ्यांतील अश्रु पुसत पुसत लिहिला. मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य ह्या आगरकरांच्या चार गुणांचा गौरव करून टिळक म्हणतात, "दुःखाची अथवा संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्या ठायीं असणाऱ्या ह्या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे ह्या कोटींतील होते."

ग्रंथालय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar